Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 156 – 160

DOI: 10.5281/zenodo.10115261

Original Research Article

# महात्मा गांधींच्या विश्वस्त विचाराची प्रासंगिकता

प्रा. डॉ. प्रवीण पांडुरंगराव लोणारकर

विभाग प्रमुख, लोकप्रशासन विभाग, बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी, बोराळकर नगर, जिंतूर रोड, परभणी ४३१४०१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: lonarkarpravin@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 26 October, 2023

**सारांश**

गांधीजींच्या विश्वस्त विचारांचा वहापोह केल्यानंतर असे लक्षात येते की विश्वस्त संकल्पना सामाजिक आर्थिक समतेवर आधारित आहे. समाजामुळेच आपण श्रीमंत व संपन्न झालो असून समाजाचे आपण काही देणे लागतो या भावनेतून समाजाप्रती उत्तरदायी बनणे आवश्यक आहे. श्रीमंतांनी त्यांच्या किमान समान गरजा पूर्ण करणारी संपत्ती स्वतःकडे ठेवून घ्यावी व अतिरिक्त संपत्ती समाजातील निर्धन, गरीब, मागास घटकाच्या उत्कर्षासाठी वापरावी. श्रीमंतांनी स्वतःहून आपल्या संपत्तीतील न्याय वाटा गरजवंतांपर्यंत पोहोचवावा. असे झाल्यास, शोषणमुक्त, समताधारित समाजाचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने ही संकल्पना महिलाचा दगड ठरली असती. स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतर देखील समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीचे स्वप्न आपण साध्य करू शकलो नाहीत. गांधीजींच्या विचारांना वेळीच मूर्त रूप दिले गेले असते तर आज भारताचे चित्र वर्तमान परिस्थितीपेक्षा कितीतरी वेगळे दिसून आले असते.

**समस्या सूत्रंन (Hypothesis):-** महात्मा गांधींचा विश्वस्त विचार सामाजिक आर्थिक समानतेवर आधारित आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे ( Objectives of research):-** गांधीजींच्या विश्वस्त विचाराची प्रासंगिकता अभ्यासणे.

**माहिती संकलन पद्धती (Data Collection method) :-** प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनासाठी द्वितीयक साधनांचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**मुख्य प्रकाशित घटक (Keywords):-** विश्वस्त संकल्पना, साधन संपत्तीचे वितरण, कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी.

**प्रस्तावना**

स्वातंत्र्य प्राप्तीसाठी मध्ये महात्मा गांधींचे योगदान अमूल्य असे होते. स्वातंत्र्य युद्धाची धुरा गांधीजींच्या हाती होती. बापूंच्या दृष्टीने स्वातंत्र्यप्राप्ती हा एक मैलाचा दगड होता. त्यामुळेच बापूंनी स्वातंत्र्यानंतर भारताची वाटचाल कशी असेल याचा आराखडा देखील तयार करून ठेवला होता. गांधीजींनी तत्कालीन काँग्रेस समोर जो 18 कलमी कार्यक्रम ठेवला होता तोच पुढे भारताच्या भावी वाटचालीचा व विकासाचा राजमार्ग ठरला. भारतीयांद्वारे दिला जाणारा स्वातंत्र्याचा लढा हा केवळ ब्रिटिशांना भारतातून घालून देण्यासाठीचा नव्हता तर एक विकसित, सर्वसमावेशक, नवसमाजाची निर्मिती करण्याचे स्वप्न बाळगणारा होता. त्या स्वप्नाला पूर्ण करण्यासाठी गांधीजींनी जी विकासाची योजना तयार केली त्यातीलच एक विश्वस्त ही महत्त्वाची संकल्पना म्हणून ओळखली जाते. “सब भूमी गोपाल की” या गांधीजींनी वारंवार वापरलेल्या विचारावर विश्वस्त संकल्पना अवलंबून असल्याचे दिसून येते.

गांधीजींची विश्वस्त संकल्पना ही सामाजिक समता निर्माण करण्यासाठी अगोदर आर्थिक समता प्रस्थापित करावी लागेल या विचारावर आधारित होती. भारत हा गरीब देश असल्याने भारतामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये गरीब आणि श्रीमंत अशी दरी निर्माण झालेली दिसून येते. ही दरी अत्यंत टोकाची असल्याचे महात्मा गांधींचे मत होते. त्यामुळे महात्मा गांधींनी विश्वस्त संकल्पनेच्या द्वारे आर्थिक समतेच्या माध्यमातून सामाजिक समता, समरसता, गरिबांचा पुनरुत्थान यासारख्या बाबी प्राप्त करण्याचा प्रयत्न केला.

**विश्वस्त म्हणजे काय :-** दुसऱ्याच्या मालकीचा व्यवस्थापक किंवा दुसऱ्याची संपत्ती काळजीपूर्वक सांभाळणारा म्हणजे विश्वस्त. स्वतःची संपत्ती समाजातील दुर्बल घटकासाठी वापरणारा विश्वस्त काळजीवाहक या अर्थाने होय. विश्वस्त संकल्पनेत संपत्ती सांभाळणाऱ्याची नसते. एखादा व्यक्ती संपत्ती हाताळत जरी असला तरी तो संपत्ती हाताळण्याचा अधिकार त्याला विश्वस्त म्हणून दिलेला असतो. गांधीजींच्या मते श्रीमंत किंवा संपन्न वर्गातील लोकांनी आपल्या न्याय गरजा भागविण्या इतकीच संपत्ती स्वतःकडे ठेवावी व उर्वरित संपत्ती ही समाजातील गरीब, निर्धन, मागासलेल्या, वंचित घटकासाठी विश्वस्त म्हणून वापरावी. महात्मा गांधींची विश्वस्त संकल्पना समाजातील श्रीमंत वर्गाला समाजाप्रती आपले असलेले उत्तरदायित्व दाखविण्याची संधी प्रदान करते. विश्वस्त संकल्पना ही भांडवलशाही आणि साम्यवाद या दोन्ही विचारधारांमधील जे दोष आहेत ते दूर करण्याचा प्रयत्न करणारी आहे. म्हणजेच दोन्हीमध्ये सुवर्णमध्य साधण्याचा गांधीजींचा प्रयत्न असलेला दिसून येतो.

गांधीजींचे असे ठाम मत होते की जर श्रीमंत अधिक श्रीमंत होत गेले व गरीब व श्रीमंतांमधील दरी अशीच वाढत गेली तर भविष्यामध्ये श्रीमंत आणि गरीब यांच्यामध्ये वर्ग संघर्ष निर्माण होणे, रक्तरंजित किंवा हिंसात्मक संघर्ष होणे अनिवार्य आहे.

गांधीजींच्या मते संपन्न किंवा श्रीमंत वर्गाने जी संपत्ती कमावलेली असते त्यामध्ये त्याचे स्वतःचे परिश्रम हे अत्यल्प असतात. परंतु त्यांना ती संपत्ती किंवा संपन्नता प्राप्त करून देण्यासाठी श्रमिक वर्ग सातत्याने कार्य करीत असतो. मात्र त्यांना श्रीमंत करणारा वर्ग हा निर्धन किंवा गरीब असतो, मागासलेला असतो. ज्यांच्या जीवावर श्रीमंत मोठे झाले संपन्न झाले त्या लोकांची ही जबाबदारी आहे की त्यांना संपत्ती प्राप्त करून देण्यामध्ये ज्या घटकांनी सहाय्य केले सहकार्य केले त्यांच्या प्रति देखील त्यांनी आपली जबाबदारी पूर्ण करावी. त्यांनी आपल्या संपत्तीचा वापर अशाच घटकांच्या उत्थानासाठी करावा की जो घटक पूर्णतः मागासलेला आहे मात्र त्यांना संपत्ती मिळून देण्यामध्ये त्या घटकाचे मोलाचे योगदान आहे.

गांधीजींनी संपत्ती कमावण्याला विरोध केलेला नाही तर त्यांच्या मते प्रत्येकाने संपत्ती ही कमवलीच पाहिजे, परंतु त्या संपत्तीतील आपल्या किमान समान गरजा भागवण्यापुरता हिस्सा स्वतःकडे ठेवून घ्यावा व उरलेली संपत्ती ही समाजातील गरजवंतांच्या उपयोगासाठी वापरावी

महात्मा गांधींनी हरिजन पत्रिकेमध्ये विश्वस्त संकल्पने संदर्भात आपले मत मांडले होते ते असे-

*“समजा मी उद्योग किंवा व्यापाराच्या माध्यमातून भरपूर संपत्ती प्राप्त केली तर मी हे मान्य केले पाहिजे की ही सर्व संपत्ती माझी नाही. या संपत्तीतील माझा वाटा तितकाच आहे जितका मला सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी आवश्यक आहे. अशा स्थितीमध्ये उर्वरित संपत्तीचा वापर अन्य लोकांच्या उपयोगासाठी करणे शिवाय दुसरी कोणतीही चांगली बाब नाही. मी हे मान्य केले पाहिजे की माझ्या न्याय गरजांशिवाय उर्वरित संपत्ती ही संपूर्ण समाजाच्या मालकीचे आहे आणि तिचा वापर समाजाच्या कल्याणाच्या हेतूनेच केला गेला पाहिजे.’* **विश्वस्त सिद्धांताचे मुख्य वैशिष्ट्ये**

**1) राष्ट्रातील संपत्तीवर सामाजिक मालकी:-** गांधीजींच्या मते राष्ट्रातील संपत्ती ही फक्त काही संपन्न व्यक्तींचीच मालकीण नाही तर राष्ट्रातील संपत्ती ही राष्ट्रातील सर्वांची आहे. या संपत्तीवर समाजाचाही तेवढाच हक्क असायला हवा जेवढा ती संपत्ती प्राप्त करणाऱ्याचा. म्हणजेच राष्ट्रातील संपत्ती ही सामाजिक मालकीची आहे.

**2) राष्ट्रीय संपत्तीचे समान वितरण करणे:-**गांधीजींच्या मते देशातील संपत्तीचे केंद्रीकरण होता कामा नये. देशातील संपत्ती केवळ मूठभर लोकांच्या हाती असू नये, तर ती संपत्ती गरजवंतांपर्यंत पोहोचली पाहिजे. समाजातील गरीब आणि वंचित घटकांना या संपत्तीची खरी आवश्यकता असते. त्यांचा देखील राष्ट्रीय संपत्तीवर तेवढाच वाट आहे जेवढा संपन्न वर्गाचा.

**3) आर्थिक समता प्रस्थापित करणे:-**विश्वस्त संकल्पना आर्थिक समता प्रस्थापित करण्यावर आधारित आहे. गरीब आणि श्रीमंत यातील भेद कमी करणे हा या संकल्पनेचा मुख्य आधार आहे. श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब अधिक गरीब झाल्यास म्हणजेच गांधीजींच्या मते संपत्तीचे समान वितरण न झाल्यास श्रीमंत आणि गरीब यांच्यामध्ये वर्ग संघर्ष निर्माण होऊ शकतो. अशी परिस्थिती येऊ द्यायची नसेल तर श्रीमंतांच्या संपत्तीतील न्याय वाटा हा गरिबांना मिळाला पाहिजे.

**4) भांडवली अर्थव्यवस्था ऐवजी समाजवादी अर्थव्यवस्थेची स्थापना:-** महात्मा गांधींचा अर्थव्यवस्थेचे भांडवलीकरण करण्यास विरोध होता. विश्वस्त संकल्पना ही भांडवलशाही व्यवस्था व साम्यवादी व्यवस्था यांच्यामधील सुवर्णमध्य साधणारी व्यवस्था असावी अशी गांधीजींची अपेक्षा होती. भांडवलशाही अर्थव्यवस्था तसेच साम्यवादी अर्थव्यवस्था दोन्ही मधील दोष दूर करून एक नवी व्यवस्था निर्माण करण्याचा महात्मा गांधींचा विश्वस्त संकल्पनेच्या माध्यमातून प्रयत्न होता.

**5) समतेचे राज्य प्रस्थापित करणे:-** विश्वस्त संकल्पनेचा गाभा हा संपत्तीचा वापर सामाजिक असमानता दूर करण्यासाठी आणि सामाजिक न्यायाल चालना देण्यासाठी केला जावा. समता व न्यायावर आधारित व्यवस्था कशी निर्माण करता येईल यावर गांधीजींनी विशेष लक्ष केंद्रित केले. गांधीजींच्या एकंदर जीवन मूल्याचा आधारच समताधिष्ठित समाज रचना निर्माण करणे हा होता. विश्वस्त संकल्पना ही त्यांच्या या विचाराच्या निर्मितीसाठीची एक मोठी व्यवस्था म्हणून गांधीजींनी अपेक्षित केली होती.

**6) शोषण मुक्त व्यवस्था-** गांधीजींच्या मते विश्वस्त संकल्पनेला व्यावहारिक रूप दिल्यास समाजामध्ये नफेखोरी, पिळवणूक, फसवणूक, शोषण इत्यादी दोष निर्माण होणार नाहीत व शोषण मुक्त समाजाचे स्वप्न साकार करता येईल.

**7) गरजवंतांना संपत्तीचे वितरण:-** विश्वस्त संकल्पनेमध्ये श्रीमंतांनी त्यांच्या किमान समान गरजा पूर्ण करणारी संपत्ती त्यांनी स्वतःकडे ठेवून घ्यावी व अतिरिक्त संपत्ती ही समाजातील निर्धन, गरीब, मागास घटकाच्या उत्कर्षासाठी वापरावी. श्रीमंतांनी स्वतःहून आपल्या संपत्तीतील न्याय वाटा गरजवंतांपर्यंत पोहोचवावा.

**विश्वस्त संकल्पनेवर करण्यात आलेली टीका**

गांधीजींच्या विश्वस्त संकल्पनेला प्रारंभीपासूनच विरोध झाला. काहींच्या मते ही संकल्पना अनेक बाबतीत अंतर विरोधाने ग्रासलेली होती त्यामुळे महात्मा गांधींना आपली संकल्पना कशी समर्पक आहे कशी वास्तव आहे याविषयी अनेक प्रयत्न करावे लागले त्यासाठी त्यांना वेळोवेळी कार्यक्रमांच्या माध्यमातून जागृती करावी लागली शंकांचे निरसन करावे लागले. त्यांच्या विश्वस्त संकल्पनेवर करण्यात येणाऱ्या टीका या पुढील प्रमाणे आहेत.

1. गांधीजींची विश्वस्त संकल्पना ही केवळ एक दिवस स्वप्न आहे वास्तवामध्ये ही संकल्पना मनुष्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीच्या विरोधी आहे म्हणजेच अव्यवहारिक आहे.
2. त्यांच्यावर करण्यात येणारी दुसरी महत्त्वाची टीका म्हणजे महात्मा गांधींची विश्वस्त संकल्पना ही साम्यवादी विचारधारेवर आधारित आहे. साम्यवादी विचारधारा निर्माण करण्याच्या दृष्टीने टाकण्यात आलेले हे एक अदृश्य पाऊल मानावे लागेल.
3. महात्मा गांधींच्या जीवन काळामध्येच त्यांच्या या संकल्पनेला म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही.

**विश्वस्त संकल्पनेची प्रासंगिकता**

महात्मा गांधींच्या विश्वस्त संकल्पनेचा सर्वाधिक प्रचार आणि प्रसार हा विनोबा भावे यांनी केला महात्मा गांधींच्या मृत्यूनंतर विनोबा भावेंनी संपूर्ण भारतभर भ्रमण करून महात्मा गांधींच्या विश्वस्त संकल्पनेला जनमानसात पोहोचविले व भूदान चळवळीच्या माध्यमातून त्यांनी संपूर्ण भारत भरात लाखो एकर भूमी संपादित केली या भूमीचे वितरण त्यांनी भूमिहीन शेतमजूर तसेच गोरगरिबां मध्ये केले.

गांधीजींनी त्यांची विश्वस्त संकल्पना तत्कालीन उद्योगपतींना देखील पटवून दिली. सर रतन टाटा, जी.डी बिर्ला, जमनालाल बजाज यांसारख्या व्यवसायिकांनी गांधीजींची ही आर्थिक तत्त्व प्रणाली स्वीकारली होती. स्वातंत्र्यलढ्याला प्रोत्साहन देण्यासोबतच या उद्योगपतींनी समाजाच्या भल्यासाठी आपल्या नफ्यातील बहुतांश भाग वापरला.

स्वातंत्र्यानंतर भारताने केलेला कमाल जमीन धारण कायदा करून संपत्तीचे केंद्रीकरण करण्यावर बंदी घातली आहे. त्याचप्रमाणे स्वीकारलेली मिश्र अर्थव्यवस्था ही गांधीजींच्या विचारांशी सुसंगत आहे.

कॉर्पोरेट सोशल रिस्पॉसिबिलिटी ही संकल्पना सध्या प्रभावीपणे पुढे येताना दिसत आहे कंपन्यांनी आपल्या नफ्यातील काही भाग समाजाच्या भल्यासाठी खर्च करण्यास सुरुवात केली असून त्यांनी टाकलेले हे पाऊल समाजाप्रती उत्तरदायित्व मान्य करण्यासारखे आहे. भारतातील मोठमोठे उद्योग चारिटेबल ट्रस्ट किंवा फाउंडेशनच्या माध्यमातून आपल्या संपत्तीतील फार मोठा हिस्सा शिक्षण, आरोग्य, पारंपारिक खेळांना प्रोत्साहन इत्यादीसाठी वापरू लागले आहेत. आज भारतातील कॉर्पोरेट क्षेत्र त्यांच्या उत्पन्नातील पाच टक्के (5%) हिस्सा स्वच्छने विश्वस्त संकल्पनेला व्यावहारिक रूप देण्यासाठी वापरू लागले आहे आणि हीच गांधीजींच्या विश्वस्त संकल्पनेची प्रसंगीत आहे असे म्हणावे लागेल.

## संदर्भ सूची


1. Bhole.L.M (2000) Essay on Gandhian social economic thought New Delhi India Shipra Publication.111,112.
2. Majumdar S. (2004) Social political idea of Mahatma Gandhi New Delhi India concept Publication House.
3. डॉ विजय **श्रीवास्तव** (2015)इंदिरा गांधी मुक्त विश्वविद्यालय मटेरियल(2015), इकाई 2 महात्मा गांधी, 31-41.
4. https://www.youtube.com/live/ccg7yBZG1xs?si=DiRs46_fhUFYKf8q
5. https://youtu.be/E1Z8fSdWaD4?si=IXOouljHCaVkOgnO